
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2025
तरूण भारत

# 'युजीसी' अधिसूचनांच्या अभ्यासासाठी समिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे सातत्याने शैक्षणिक अर्हता, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने व इतर बाबीसंदर्भात वेगवेगळ्या मार्गदर्शक सूचना, तसेच नियामक मसुदे तयार करून निर्गमित करीत असतात. नवनवीन मसुद्यांची व नियामक बदलांची वारंवारिता वाढली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे निर्गमित होणाऱ्या विविध अधिसूचना, मार्गदर्शक तत्वे, यांचा अभ्यास करून शासनास अभिप्राय सादर करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.



समितीचे अध्यक्ष शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची नियुक्ती केली आहे. तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे सदस्य असतील. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही.

- **अध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु शिर्के**

एल. माहेश्वरी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह अन्य आठ सदस्यांची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग ज्या वेळी काही नवीन अधिसूचना, अधिसूचनेचा मसुदा अथवा मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द करेल त्या वेळेस सदर समिती अधिसूचना अथवा मार्गदर्शक तत्वांविषयी तत्काळ बैठक आयोजित करून अभिप्राय संचालनालयास सादर करण्याचे काम करेल.

30 JAN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषेची सातत्याने मीमांसा, चिकित्सा आवश्यक

## शिवाजी विद्यापीठातील 'मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक सिद्धांतांची पुनर्मीमांसा' यावरील परिसंवादातील सूर

तरुण भारत
विद्यापीठातून

प्रतिनिधी
कोल्हापूर

भाषेला सौष्ठव आणि श्रेष्ठत्व प्राप्त होण्यासाठी हजारो वर्षे जावी लागलेली असतात. काळानुरुप तिचे स्वरुप बदलत असते. भाषेचे वैभव टिकवून ठेवण्यासाठी तिला भाषिक राजकारणापासून जपण्याची आवश्यकता असते. त्यासाठी सातत्याने तिची मीमांसा, चिकित्सा केली पाहिजे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात उमटला.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत 'मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक सिद्धांतांची पुनर्मीमांसा' या विषयावर एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादामध्ये रवींद्र इंगळे-चावरेकर (बुलडाणा) यांनी बीजमांडणी केली. डॉ. दिलीप चव्हाण (नांदेड) आणि डॉ. गोमटेश्वर पाटील (कोल्हापूर) यांनी परिसंवादात सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित मराठी भाषाविषयक परिसंवादात बीजमांडणी करताना रवींद्र इंगळे-चावरेकर.

रवींद्र इंगळे-चावरेकर म्हणाले, उपलब्ध साहित्यावरुन भाषेचे प्राचीनत्व आणि अभिजनत्व यांची निश्चिती केली जाते. मराठी भाषेमध्ये सन ११२९मध्ये 'मानसोल्हास', त्यानंतर बाराव्या शतकात विवेकसिंधु, लीळाचरित्रापासून ते पुढे ज्ञानेश्वरीपर्यंत असे नऊ ग्रंथ सापडतात. या ग्रंथांतील मराठीचे भाषावैभव उच्च दर्जाचे आहे. भाषा जन्मली आणि लगेच त्या भाषेमध्ये समृद्ध वाङ्मय निर्माण झाले, असे होत नाही. मराठीतील या उपलब्ध साहित्यामध्येही ग्रंथभाषा आणि लोकव्यवहार भाषा असा फरक दिसतो.

'मराठी भाषा: बहुविध इतिहासाची दृष्टी' या विषयावर डॉ. दिलीप चव्हाण म्हणाले, ब्रिटीश काळात मराठीविषयी भाषाशुद्धीच्या अनुषंगाने चांगले विचार मांडण्यात आले. भांडारकर, चिपळूणकर, तर्खडकर, दामले इत्यादी व्याकरणकारांवर तौलनिक भाषाविज्ञानाचा मोठा प्रभाव दिसतो. जर्मन आणि ब्रिटीश अभ्यासकांनी संस्कृत आणि इतर भाषांचा सहसंबंध जोडून घेतला. भाषांमध्ये हा आंतरिक व्यवहारही समृद्धतेच्या दिशेने घेऊन जातो.

'मराठीच्या पूर्वेतिहासाचा शोध' या विषयावर गोमटेश्वर पाटील म्हणाले, महाराष्ट्रीय अपभ्रंश भाषेतून मराठी भाषेचा पूर्वेतिहास आपल्याला शोधता येतो. महाराष्ट्रीय प्राकृत आणि महाराष्ट्रीय अपभ्रंश यांचा सहसंबंधही जोडता येतो. महाराष्ट्रीय मध्ययुगीन कवींच्या साहित्यातूनही मराठीच्या पूर्वेतिहासाचा शोध घेता येतो. शिलालेख, ताम्रपट, गद्यलेखन यांमधून मराठीची वेगवेगळी रुपे सापडतात.

डॉ. महादेव देशमुख म्हणाले, भाषा आणि बोलीभाषा तसेच भाषा आणि लिपी यांच्यातही फरक असतो. या रुपांतरणाचा आणि फरकांचा अभ्यास व्हायला हवा. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठात होतअसलेल्या परिसंवादाचे दस्तावेजीकरण व्हायला हवे. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करुन दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य जी. पी. माळी, डॉ. अनिल गवळी, डॉ. मेघा पानसरे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. अरुण शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2025
तरुण भारत

# ऑनलाइन शिक्षण अपरिहार्य

## महास्वयंम ऑनलाईन कोर्सचे प्रशिक्षक गणेश लोखंडे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरणानुसार आणि वाढत्या तंत्रज्ञानामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना ऑनलाइन अध्यापन आणि अध्ययन करणे अपरिहार्य असणार आहे. यासाठी ई- कंटेंट निर्मितीवर भर द्यायला हवा, असे प्रतिपादन मुंबई येथील महास्वयंम ऑनलाइन कोर्सचे प्रशिक्षक गणेश लोखंडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र आणि एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने पीएम उषा योजने अंतर्गत डिझाईन ॲण्ड डेव्हलपमेंट ऑफ ई-कन्टेन्ट फॉर ऑनलाईन लर्निंग ॲंड मूक्स कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

लोखंडे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या स्वयं, महास्वयंम या ऑनलाइन कोर्स बाबत माहिती दिली. तसेच ई-कंटेंट निर्मितीसाठी आवश्यक घटकांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना या क्षेत्रात येणाऱ्या काळात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. प्राध्यापक डॉ. राजेंद्र परीजात यांनी ई-कंटेंट निर्मितीचे विश्लेषण करताना डिजिटल मीडिया कंटेंट, फिल्म कंटेंट, न्यूज कन्टेन्ट आदीची प्रात्यक्षिकाद्वारे मांडणी केली.




**कोल्हापूर : दूरशिक्षण विभागातील आयोजित कार्यक्रमात गणेश लोखंडे यांचे स्वागत करतना डॉ. कृष्णा पाटील. सोबत डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे आदी.**

स्वागत डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. आभार नाझिया मुल्लानी यांनी मानले. डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ.अविनाश भाले, डॉ. राहुल चित्रकार, डॉ. किशोर खिलारे, जयप्रकाश पाटील, रवींद्र खैरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2025
सकाळ

# विद्यापीठात सोमवारी शिल्पकला कार्यशाळा



कोल्हापूर : शिल्पमहर्षी शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठात सोमवारी (ता. ३ फेब्रुवारी) सकाळी दहा ते दुपारी चार यावेळेत विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानात शिल्पकला कार्यशाळा आयोजित केली आहे. विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि शिल्पसम्राट कला स्टुडिओ यांच्यातर्फे स्वर्गीय शिल्पकार बी.आर. खेडकर यांच्या कलेच्या स्मृती सर्वांपर्यंत पोहोचाव्यात आणि नवशिल्पकार व कलाकारांना प्रेरणा मिळावी, या हेतूने शिल्पकला कार्यशाळा आयोजित केली आहे. त्यामध्ये खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के आणि शिल्पकार संजीव संकपाळ प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेतील सहभागासाठी इच्छुकांनी एक फेब्रुवारीपर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

30 JAN 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषेकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघा

## डॉ. नंदकुमार मोरे : वारणा महाविद्यालयात कार्यशाळा

वारणानगर, ता. २९ : 'अभिजात ११ भाषांपैकी मराठी एक अभिजात भाषा ठरली आहे. कोणतीही भाषा ही हजारो वर्षांचे ज्ञान, परंपरा, विधी, सण-उत्सव व जगण्याचे सत्त्व घेऊन वावरत असते. तसे पाहिले तर भाषेचे महत्त्वाचे कार्य म्हणजे व्यवहार पूर्ण करणे, त्यावरूनच त्या भाषेची श्रेष्ठता ठरत असते. कोणतीही भाषा शुद्ध किंवा अशुद्ध असत नाही. तरुण, विद्यार्थी, अभ्यासकांनी भाषेकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी येथे केले.

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मराठी भाषा पंधरवड्या निमित्त 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली. यावेळी ते बोलत होते.



वारणानगर : प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांचा सत्कार करताना प्राचार्य प्रो. डॉ. ए. एम. शेख. यावेळी उपस्थित मान्यवर.

अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. ए. एम. शेख होते. प्राचार्य प्रो. डॉ. ए. एम. शेख यांनी अभिजात भाषेचे निकष व महत्त्व विशद केले. वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जीनी यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेत विविध अग्रणी महाविद्यालयांतून शंभरांहून अधिक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रो. डॉ. डी. आर. धेडे, प्रा. अविनाश पाटील यांचे सहकार्य लाभले. मराठी विभागप्रमुख डॉ. सर्जेराव जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. आर. एस. पांडव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. वैष्णवी जाखले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. के. वानोळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
30 JAN 2025 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ मानवतेसाठीची

## - डॉ. सुनीता सावरकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली चळवळ कोणत्याही विशिष्ट जात किंवा समुदायापुरती मर्यादित नव्हती, तर ती मानवी हक्क प्रस्थापित करणाऱ्या लोकांची मानवतेसाठीची चळवळ होती, असे प्रतिपादन डॉ. सुनीता सावरकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या



'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेच्या शतकपूर्तीनिमित्त 'ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ' पुस्तकावरील परिसंवादामध्ये त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. रणधीर शिंदे, डॉ. दीपा श्रावस्ती यांनी मते मांडली. अध्यक्षीय मनोगतात डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, आंबेडकरी चळवळीचे भान आणि जाणिवा जागृत झालेल्या स्त्रियांच्या कार्याची नोंद या पुस्तकाने घेतली आहे. प्रास्ताविक अविनाश भाले यांनी केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. यावेळी सुरेश शिपूरकर, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. अवनिश पाटील, जयवंत व्हटकर, मधुकर शिर्के, डॉ. चंद्रकांत शिर्के, मदन पवार, किरण गवळी आदी उपस्थित होते..